**ठळक बातम्या**

- नवनियुक्त मंत्र्यांनी स्वीकारला आपापल्या पदाचा कार्यभार
- उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेस पक्षाची आजपासून ‘धन्यवाद यात्रा’
- नीट परीक्षेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाची राष्ट्रीय चाचणी संस्थेला नोटीस/ मात्र काऊन्सिलिंग प्रकियेला स्थगिती द्यायला नकार
- महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी छाननीनंतर एकंदर ८८ उमेदवारांचे अर्ज वैध
- अमेरिकेने मांडलेल्या गाझा युद्धविराम प्रस्तावाला संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेची मंजुरी

**आणि**

- भारताचे टेनिसपटू रोहन बोपण्णा आणि सुमित नागल यांचा पॅरिस ऑलिंपिकमधे प्रवेश निश्चित

**<><><><><>**

केंद्रातल्या नव्या मंत्रिमंडळाचं खातेवाटप काल जाहीर झाल्यानंतर आज नवनियुक्त मंत्र्यांनी आपापल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. डॉ. एस. जयशंकर यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्रीपदाचा कार्यभार हातात घेतला. अश्विनी वैष्णव यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रीपदाची, तर डॉ. एल. मुरुगन यांनी माहिती आणि प्रसारण राज्यमंत्रीपदाची सूत्रं हातात घेतली. हरदीप सिंह पुरी यांनी पेट्रोलियम आणि वायू मंत्री म्हणून, तर सुरेश गोपी यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून पदभार सांभाळला.

गिरिराज सिंह यांनी माजी वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थितीत वस्त्रोद्योग मंत्रालयाचं काम हाती घेतलं. पवित्र मार्गारिटा यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली. लोक जनशक्ती पक्ष (रामविलास पासवान) पक्षाचे नेते चिराग पासवान यांनी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री म्हणून पदभार स्वीकारला. किरेन रिजिजू यांनी संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक मंत्री म्हणून, तर मनोहर लाल यांनी केंद्रीय ऊर्जामंत्री म्हणून कार्यभार स्वीकारला. जितेंद्र सिंह यांनी कर्मचारी आणि प्रशिक्षण विभागाचे राज्यमंत्री, स्वतंत्र प्रभार म्हणून पदभार हाती घेतला. जयंत चौधरी यांनी कौशल्य विभाग आणि स्वयंउद्योजकता विभागाचे मंत्री म्हणून कामाला सुरुवात केली. राजनाथ सिंह यांनी संरक्षण मंत्री म्हणून, तर संजय सेठ यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून कामकाज पाहण्यास सुरुवात केली.

**<><><><><>**

दहावा आंतरराष्ट्रीय योगदिन येत्या २१ जून रोजी साजरा होणार आहे. या निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी योगाचं महत्त्व अधोरेखित केलं आहे. योग हा एक नियमित अभ्यास करण्याची गोष्ट आहे, हे एकोप्याचं प्रतीक आहे, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. सांस्कृतिक आणि भौगोलिक भेद मिटवण्याचं सामर्थ्य योगात आहे. जगभरातल्या लाखो लोकांना योगानं एकत्र आणलं आहे, असंही प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं. सर्वांनी योगाला आपल्या जगण्याचा अविभाज्य भाग करून घ्यावं आणि इतरांनाही तसं करण्यासाठी प्रोत्साहन द्यावं. आयुष्यातल्या आव्हानांचा सामना शांतचित्ताने करण्याची आणि आयुष्याला दिशा देण्याची शक्ती योगातून मिळते, असं त्यांनी सांगितलं. विविध योगासनं आणि त्यांचे फायदे सांगणारी एक ध्वनिचित्रफीतही प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमांवर शेअर केली आहे.

<><><><>

केंद्राकडून राज्यांना जून महिन्यासाठी, संकलित करांपैकी एक लाख ३९ हजार कोटी रुपयांची रक्कम वितरित करण्यात आली आहे. या रकमेचा उपयोग विकासकामांना गती देण्यासाठी आणि भांडवली खर्चांसाठी होईल, असं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे. उत्तर प्रदेशला २५ हजार कोटी, बिहारला १४ हजार कोटी, तर मध्य प्रदेशला ११ हजार कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. २०२४-२५ साठीच्या अंतरिम अर्थसंकल्पात संकलित करांपैकी राज्यांना २२ लाख २० हजार कोटी रुपये वितरित करण्याचा प्रस्ताव आहे. जून २०२४ साठीच्या नियमित रकमेबरोबर आणखी एक हप्ता वितरित केला जाईल, असं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><>

उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेस पक्ष आजपासून १५ जूनपर्यंत राज्यातल्या सर्व ४०३ विधानसभा मतदारसंघांमध्ये 'धन्यवाद यात्रा' काढणार आहे. काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी आणि काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी वाड्रा हे या मोहिमेचा प्रारंभ करणार आहेत. रायबरेलीच्या भुये मऊ भागात सभेला संबोधित करताना रायबरेली आणि अमेठीच्या जनतेचे लोकसभा निवडणुकीत पाठिंबा दिल्याबद्दल आभार मानणार आहेत. राष्ट्रीय सरचिटणीस, उत्तर प्रदेश राज्य प्रभारी अविनाश पांडे आणि प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष अजय राय यांच्या अध्यक्षतेखाली काल लखनौमध्ये झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. काँग्रेसचे सर्व खासदार, आमदार, ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्ते या यात्रेत सहभागी होणार आहेत.

<><><><>

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेत यंदा पेपरफुटी आणि काही गैरप्रकार झाल्याचा आरोप करत त्याच्या चौकशीची आणि पूर्ण परीक्षा प्रक्रीयाच रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती अहसानउद्दीन अमान उल्लाह यांच्या सुट्टीकालीन पीठानं त्यावर राष्ट्रीय चाचणी संस्थेला नोटीस बजावली असून पुढची सुनावणी येत्या ८ जुलैला ठेवली आहे. मात्र परीक्षेनंतरच्या काउन्सिलिंग प्रक्रीयेला स्थगिती द्यायला न्यायालयानं नकार दिला. अशाच आशयाच्या याचिका कोलकाता आणि दिल्ली उच्च न्यायालयातही दाखल झाल्या आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी छाननीनंतर एकंदर ८८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसंच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांकरता येत्या २६ जून रोजी मतदान होणार आहे. उद्यापर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. १ जुलैला मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंग तमांग यांनी शपथ घेतल्यानंतर मंत्रिमंडळाची पहिली बैठक घेतली. विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून संजीत खरेल यांच्या नियुक्तीची शिफारस राज्यपालांना करण्यात आली. या बैठकीत भूस्खलनग्रस्त कुटुंबांसाठी सानुग्रह अनुदान आणि घरबांधणीचा निर्णय घेतला. याशिवाय राज्यसरकारी कर्मचारी आणि निवृत्ती वेतनधारकांना महागाई भत्त्यात चार टक्के वाढ देण्याचाही

निर्णय घेण्यात आला. सिक्कीम राज्यस्थापनेच्या सुवर्ण वर्षानिमित्तानं भव्य कार्यक्रम करण्याचा निर्णय झाला.

**<><><><><>**

ओडिशात नवीन मुख्यमंत्र्याच्या निवडीसाठी भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ पक्षाची आज दुपारी भुवनेश्वरमध्ये बैठक होणार आहे. नेतानिवडीबाबत केंद्रीय मंत्री राजनाथसिंह आणि भूपेंद्र यादव यांची केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्रिपदाबाबत सहमतीनं निर्णय होण्याच्या दृष्टीनं ते आमदारांशी चर्चा करतील. ओडिशा विधानसभेत भारतीय जनता पार्टीनं १४७ पैकी ७८ जागा जिंकून बहुमत मिळवलं आहे. नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी उद्या भुवनेश्वरमधल्या जनता मैदानावर होणार आहे.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं अमेरिकेनं प्रस्तावित इस्रायल-गाझा युद्धबंदी योजनेला मंजुरी दिली आहे. यात संपूर्ण युद्धविराम, हमासच्या ताब्यात असलेल्या ओलीसांची सुटका, मरण पावलेल्या ओलिसांचे मृतदेह परत करणे आणि पॅलेस्टिनी कैद्यांची देवाणघेवाण या अटींचा समावेश आहे. अमेरिकेसह सुरक्षा परिषदेच्या १५ सदस्यांपैकी १४ सदस्यांनी ठरावाच्या बाजूनं मतदान केलं. रशिया अलिप्त राहिला. इस्रायलनं आणि हमासनं हा ठराव मान्य करावा, असं आवाहन करण्यात येत आहे.

**<><><><><>**

भारताचे टेनिसपटू रोहन बोपण्णा आणि सुमित नागल या दोघांनी आपल्या एटीपी क्रमवारीच्या जोरावर आगामी पॅरिस ऑलिम्पिकमधलं आपलं स्थान निश्चित केलं. रोहन बोपण्णा दुहेरीत, तर सुमित नागल एकेरीत भारताचं प्रतिनिधित्व करेल. दुहेरीच्या जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या रोहन बोपण्णाला

ऑलिम्पिकमध्ये सहज प्रवेश मिळाला, तर सुमित नागलनं एकेरीच्या क्रमवारीत १८ स्थानांची झेप घेऊन ऑलिम्पिकमध्ये प्रवेश मिळवला.

<><><><><>

डिसेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या पुरुष ज्युनियर विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भारताला देण्यात आलं आहे. आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या कार्यकारी मंडळानं आज स्वित्झर्लंड मध्ये झालेल्या बैठकीत हा निर्णय घेतला.

<><><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल न्यूयॉर्क इथं झालेल्या चुरशीच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं बांगलादेशचा चार धावांनी पराभव केला. आज पाकिस्तान आणि कॅनडा या संघांदरम्यान सामना होणार आहे.

<><><><><>

नैर्ऋत्य मोसमी पाऊस येत्या दोन दिवसांत उत्तर अरबी समुद्र, गुजरात आणि महाराष्ट्राच्या आणखी भागांमध्ये पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि कर्नाटकात पुढचे चार ते पाच दिवस वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता असल्यानं या भागांना हवामान विभागानं रेड अलर्ट दिला आहे.

दरम्यान, महाराष्ट्राच्या बहुतांश भागांमध्ये पावसानं हजेरी लावली आहे. मुंबईतही अधून मधून पावसाच्या जोरदार सरी येत आहेत. बीड जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. जळगाव, लातूर, जालना, अकोला आणि सांगली इथं काल संध्याकाळच्या सुमाराला जोरदार पावसानं हजेरी लावली. अहमदनगर जिल्ह्यात आज सकाळपासून पाऊस सुरू आहे. परभणी जिल्ह्यात काल झालेल्या ढगफुटीसदृश पावसात एक महिला वाहून गेली.

//<><><><><>//